# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

जा.क्र.भिनिशमनपा/आयुक्त कार्या/०५७ /२०२०
दिनांक :-२०/०३/२०२०

<u>अत्यंत महत्वाचे/तातडीचे</u>

## परिपत्रक

वाचाः १. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम१८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन कायदा,२००५ चे कलम ३०,३३,३४,४१ व कलम ५१.
३. महाराष्ट्र शासन सार्व.आरोग्य विभागाकडील अधिसुचना क्रमांक कोरोना२०२०/ प्र.क्र५८/ आरोग्य ५ दिनांक १३ मार्च २०२०.
४. महाराष्ट्र शासन सार्व.आरोग्य विभागाकडील अधिसुचना क्रमांक कोरोना२०२०/ प्र.क्र५८/ आरोग्य, दिनांक १४ मार्च २०२० अन्वये महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.
५. मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील जा.क्र. जिकाठा/ जि.आ.नि.कक्ष/ कोरोना/ सेवा व इतर/ आदेश/ २०२०. दि.२०/०३/२०२०.

ज्याअर्थी, राज्य शासनाने संदर्भिय क्र.१ अन्वये कोरोना विषाणुचा कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदींचे अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भिय ४ अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केले आहे.

वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.५ अन्वये मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधीकरण ठाणे यांनी परिपत्रक निर्गमित केलेले आहे.

त्याअर्थी, कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांची एका ठिकाणी गर्दी टाळण्यासाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील **सर्व दुकाने व आस्थापना** (अत्यावश्यक किराणा सामान (GROCERY), दुध व भाजीपाला व अन्य जीवनावश्यक वस्तु व औषधालय (CHEMIST SHOP) किराणा वगळुन) तसेच **हॉटेल्स, बियर बार, वाईन शॉप** (हॉटेल्समधील टेक अवे/पार्सल (घरी जेवण घेऊन जाणे) सर्व्हिस वगळुन) दि. ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याद्वारे आदेशित करण्यात येत आहे. तसेच जी किराणा मालाची दुकाने, औषधालय,दुधाची व भाजीपाला आणि जीवनावश्यक वस्तुची दुकाने उघडी ठेवण्यात येणार आहेत. अशा ठिकाणी आवश्यक ती स्वच्छता ठेवण्यात यावी. तसेच नागरीकांकरीता हॅन्ड वॉश, सॅनिटायझर उपलब्ध करून देण्यात यावे असे आदेशित करीत आहे.

या आदेशानुसार तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची दैनंदिन माहिती / अहवाल संबंधित अधिकारी यांनी निम्नस्वाक्षरीकार यांना सादर करावा.

(सही/-)
आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.

**प्रति,**
१. सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र. १ ते ५.
२. प्रभाग आरोग्य निरीक्षक, प्रभाग समिती क्र.१ ते ५.

Scanned with CamScanner

३. विभाग प्रमुख, शहर विकास विभाग.
४. विभाग प्रमुख, परवाना विभाग.

**प्रतः माहीतीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव.**
विभागप्रमुख (जाहिरात).

/- यांनी सहा.आयुक्त प्र.स.क्र. १ ते ५ यांचेकडुन केलेल्या कार्यवाहीची दैनंदिन माहिती / अहवाल एकत्रित करुन तात्काळ निम्नस्वाक्षरीकार यांना सादर करावा.

**प्रतः माहीतीस्तव.**
१.मा.पोलीस उप-आयुक्त(परिमंडळ-२)
२.उप-आयुक्त (मुख्या.).
३.उप-आयुक्त (सार्व.आरोग्य).
४.जाहीरात विभाग.
५.परवाना विभाग.
६.जनसंपर्क विभाग.
७.आस्थापना निवड नस्ती.

**प्रतः** माहितीस्तव सविनय सादर.
१) मा.महापौर सो.
२) मा.उप-महापौर सो.
३) मा.विरोधी पक्ष नेता सो.
४) मा.सभापती, स्थायी समिती सो.
५) मा.सभागृह नेता सो,
६) मा.गट नेता सो. (सर्व).
७) मा.सभापती, महीला व बाल कल्याण.

(डॉ.प्रविण आष्टीकर)
आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.

Scanned with CamScanner